महाराष्ट्र शासन
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१
Phone No.(020) 26125692/26125693 ई-मेल : depmah2@gmail.com

क्रमांक : प्राशिसं-८०२/जेष्ठ नाग./२०२५ दिनांक २९.०७.२०२५

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
३. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई
४. शिक्षण निरीक्षक, (उत्तर, दक्षिण, पश्चिम)
५. प्रशासन अधिकारी/शिक्षण प्रमुख, मनपा/नपा/नप, (सर्व)

विषय : दि.१५ जून हा जेष्ठ नागरीक अत्याचार जागरुकता दिन राज्यभर साजरा करणेबाबत
संदर्भ : शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.२४१/एस.डी. ४, दि १५ जुलै, २०२५

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भाधीन पत्र व त्यासोबतच्या (महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), नवी मुंबई यांच्या दि.३१.५.२०२५ चे पत्र) सहपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

राज्यामध्ये जेष्ठ नागरीकांची संख्या मोठया प्रमाणात असून त्यांच्यावर होत असलेल्या अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर,दि.१५ जून या जेष्ठ नागरीक अत्याचार जागृती दिनी राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी एकाच वेळी "मी जेष्ठ नागरिकांवर कोणताही अत्याचार करणार नाही / करु देणार नाही" अशा स्वरुपाची शपथ घेऊन जेष्ठ नागरीक अत्याचार जागृती दिवस साजरा करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

सन २०२५ चा दि.१५ जून रोजीचा जेष्ठ नागरीक अत्याचार जागृती दिन संपन्न झालेला आहे. त्यामुळे सदर शपथ ही या वर्षाकरीता दि.१५ ऑगस्ट रोजी "राज्यातील इयत्ता १ ली ते १२ वी च्या सर्व विदयार्थ्यांमार्फत एकाच वेळी घ्यावी व यापुढे दरवर्षी दिनांक १५ जून रोजी अशी शपथ घेऊन जेष्ठ नागरीक अत्याचार जागृती दिन साजरा करण्याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश दयावेत.

सहपत्र - वरीलप्रमाणे

(शरद गोसावी)
शिक्षण संचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महा.शासन, मंत्रालय, मुंबई
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य , पुणे